# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:07.03.2026** **वार:शनिवार**

1. राज्याच्या 2026-27 च्या अर्थसंकल्पात कृषि, पायाभूत सुविधा, पर्यटन आदि क्षेत्रांसाठी भरीव तरतूद
2. येत्या आर्थिक वर्षात राज्याची महसुली तूट 40 हजार 552 कोटी रुपये राहण्याचा अंदाज
3. राज्याची अर्थव्यवस्था 2047 पर्यंत पाच ट्रिलियन डॉलर्सची करण्याचं उद्दिष्ट; शेतकऱ्यांसाठी 2 लाखापर्यंत कर्जमाफीची घोषणा; आणि
4. शेती हा देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा-पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

**<u>अर्थसंकल्प</u>**

विकसित महाराष्ट्राचा 2026-27 या आर्थिक वर्षासाठीचा अर्थसंकल्प मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल विधानसभेत सादर केला. सात लाख 69 हजार 467 कोटी रुपयांच्या या अर्थसंकल्पात सहा लाख 16 हजार 99 कोटी रुपये महसुली जमा आणि सहा लाख 56 हजार 651 कोटी रुपयांचा महसुली खर्च अंदाजित आहे. त्यामुळे 40 हजार 552 कोटी रुपयांच्या अंदाजित तुटीचा हा अर्थसंकल्प असून राजकोषिय तूट स्थुल उत्पन्नाच्या तीन टक्क्यांपेक्षा कमी ठेवण्यात सरकारला यश आलं आहे.

प्रगतीशील, शाश्वत, सर्वसमावेशक, सुशासन या चार प्रमुख स्तंभांवर आधारित या अर्थसंकल्पात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजनेची महत्त्वपूर्ण घोषणा करण्यात आली आहे. 30 सप्टेंबर 2025 रोजी पीककर्ज थकित असलेल्या पात्र शेतकाऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी तसंच नियमित कर्ज परतफेड करणाऱ्या पात्र शेतकाऱ्यांना प्रोत्साहन म्हणून 50 हजार रुपयांचं अनुदान देण्यात येणार आहे. या अर्थसंकल्पातील ठळक मुद्दयावर आधारित हा वृत्तांत.......

**राज्याला 2047 पर्यंत विकसित करण्याचं उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून तयार केलेला अर्थसंकल्प काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी, अर्थमंत्री म्हणून विधानसभेत सादर केला. भाषणाच्या सुरुवातीला त्यांनी दिवंगत उपमुख्यमंत्री तसंच अर्थमंत्री अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पण केली.......**

***अजितदादा व अर्थसंकल्प हे नाते दृढ झाले होते त्यांच्या करड्या शिस्तीमुळेच महाराष्ट्राची वित्तीय स्थिती कठीण काळातही स्थिर राहिली. त्यांना श्रद्धांजली म्हणून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला साजेशे भव्य स्मारक उभारण्यात येईल. तसेच त्यांच्या नावे गतिमान नागरी सेवा पुरस्कार देण्यात येईल. दिवंगत अजितदादांच्या स्मृतींना आजचा हा अर्थसंकल्प मी समर्पित करतो.***

**2030पर्यंत राज्याची अर्थव्यवस्था, 1 ट्रिलियन डॉलर्सची आणि, 2047 पर्यंत 5 ट्रिलियन डॉलर्सची करण्याचं उद्दिष्ट असल्याचं फडणवीस म्हणाले. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर शेतकरी कर्जमाफी योजनेची घोषणाही त्यांनी केली....**

***राज्यातील 30 सप्टेंबर 2025 रोजी पीक कर्ज थकीत असणाऱ्या पात्र शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी देणारी, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना मी आज जाहीर करीत आहे.***

**कृषि क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेला आणि नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन देण्यात येणार आहे, शेतीमालाला जागतिक बाजारपेठ देण्यासाठी 10 ते 15 पिकांची एकात्मिक मूल्यसाखळी निर्माण करणार, बळीराजा मोफत वीज योजना सुरुच राहणार, मत्स्यसंपदा योजने अंतर्गत प्रतिवर्षी 1 हजार 240 कोटी रुपये देणार, तसंच दिवंगत गोपीनाथ मुंडे अपघात सानुग्रह अनुदान योजनेत शेतमजुरांचा समावेश करणार असल्याची घोषणा या अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. राज्यातील नदी जोड प्रकल्पांसाठी या अर्थसंकल्पात भरीव आर्थिक तरतूद करण्यात आली आहे.**

**बहुचर्चित 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' यापुढेही सुरूच राहील अशी घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली....**

***येणाऱ्या आठ मार्च रोजीच्या जागतिक महिला दिनानिमित्त राज्यातील सर्व लाडक्या बहिणींना मी शुभेच्छा देतो. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण ही योजना अशीच सुरु राहणार आहे व या योजनेकरिता आवश्यक ती भरीव तरतूद करण्यात आलेली आहे.***

**2026-27 या वर्षात आणखी 25 लाख लखपती दिदी निर्माण करण्याचं उद्दिष्ट असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.**

**प्रत्येक जिल्ह्यात सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग केंद्र स्थापण्यात येणार असून, दोन नवी आयुक्तालयं निर्माण करण्यात येणार आहेत. मुंबई आणि पुण्यात 50 अब्ज डॉलर्सचं मिडिया टेक आणि एव्हीजीसी केंद्र, नवीन 400 जागतिक क्षमता केंद्र तसंच नवउपक्रम शहरांची उभारणी केली जाणार आहे.**

**राज्य सरकार 300 कोटी वृक्ष लागवड मोहीम हाती घेणार आहे. या वर्षात, नवी मुंबईत 6 देशांचं विद्यापीठ सुरू करण्यात येणार असून, याच धर्तीवर 8 ते 10 शैक्षणिक शहरं विकसित केली जाणार आहेत.**

**युनेस्कोच्या यादीत समाविष्ट असलेल्या 12 किल्ल्यांचा वारसा जतन करण्यासाठी उपाययोजना; तसंच छत्रपती संभाजी महाराजांचं स्मारक, आंबेगाव शिवसृष्टी, राजकोट किल्ला, उत्तर प्रदेशात आग्रा इथं छत्रपती शिवाजी महाराजांचं स्मारक आणि हरियाणामध्ये पानिपत इथं मराठा शौर्य स्मारकासाठीही निधी मंजुर करण्यात आला आहे.**

**महात्मा फुले, संत गाडगेबाबा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मृतिंचं विशेष वर्ष म्हणून 2026-27 हे 'सामाजिक समता आणि समरसता वर्ष' म्हणून साजरं केलं जाणार आहे. नाशिक-त्र्यंबकमधील आगामी कुंभमेळ्यासाठीही भरीव तरतूद करण्यात आली आहे. राज्यात आरोग्य विभागाच्या सर्व सुविधा देण्यासाठी शहरी आरोग्य आयुक्तालयाची स्थापना केली जाणार आहे.**

**राज्यात 12शे किलोमीटरचं मेट्रो रेल्वेचं जाळं आणि 6 हजार किलोमीटरपेक्षा जास्त एक्सप्रेसवे विकसित करण्याचं नियोजन आहे; याबरोबरच पुणे, मुंबईतील विस्तारीत मेट्रो मार्ग, विविध विमानतळाचा विकास, शिरूर ते छत्रपती संभाजीनगर ग्रीनफिल्ड महामार्गासाठी निधीची घोषणा फडणवीस यांनी केली.**

**प्रतिक्रिया**

हा अर्थसंकल्प सर्वसमावेशक असून, विकसित महाराष्ट्र 2047 कडे खंबीरपणे वाटचाल करणारा आहे, अशी प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केली, तर, हा अर्थसंकल्प दूरदृष्टिपूर्ण आणि व्हीजन डॉक्युमेंटची प्रभावी अंमलबजावणी करणारा असल्याचं मत उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी व्यक्त केलं. अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत त्या बोलत होत्या.

विरोधी पक्षांनी या अर्थसंकल्पावर टीका केली आहे. सर्वसामान्य जनतेला स्थान देण्यात आलं नसून, मोजकी शहरं आणि मोजक्या लोकांच्याच फायद्याचा आहे अशी प्रतिक्रिया कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दिली आहे. तर, या

अर्थसंकल्पांत विकासाचं मृगजळ दाखवण्यात आलं असल्याचं मत शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी व्यक्त केलं. या अर्थसंकल्पात जुन्याच घोषणा नव्याने मांडण्यात आल्या असून, ताळमेळ नसलेला हा अर्थसंकल्प असल्याची टीका विजय वडेट्टिवार यांनी केली आहे.

**पंतप्रधान-वेबिनार**

शेती ही देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा असून, देशाच्या दीर्घकालीन विकास प्रवासासाठी एक धोरणात्मक आधारस्तंभ आहे असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. कृषि आणि ग्रामीण परिवर्तन या विषयावर काल आयोजित करण्यात आलेल्या अर्थसंकल्पोत्तर वेबिनारला ते दूरदृश्य प्राणलीच्या माध्यमातून संबोधित करत होते. या वर्षीचा अर्थसंकल्प शेती आणि ग्रामीण परिवर्तनाला पोषक आहे असं सांगत, देशात सध्या अन्नधान्य, डाळी आणि तेलबियांचे विक्रमी उत्पादन होत असल्याचं त्यांनी नमूद केलं. सरकार शेतीमध्ये तंत्रज्ञान आणण्यावर भर देत असल्याचं पंतप्रधान पुढे म्हणाले.

**लोकसेवा आयोग**

केंद्रीय लोकसेवा आयोगातर्फे घेण्यात आलेल्या नागरी सेवा परीक्षा-2025 मध्ये देशातील एकंदर 958 उमेदवार यशस्वी झाले आहेत. यात राज्यातील 60 हून अधिक उमदेवारांचा समावेश आहे. अधिकृत निकाल आणि यशस्वी उमदेवारांची नावे केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

**शिवजयंती**

छत्रपती शिवाजी महाराजांची तिथीनुसार जयंती काल राज्यात ठीकठिकाणी साजरी करण्यात आली. पुण्यात शिवजयंतीनिमित्त मिरवणुका आणि अन्य सांस्कृतिक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं होतं.

**फळ निर्यात फटका-नवी मुंबई**

आखाती देशांत सध्या सुरू असलेल्या युद्धाचा मोठा फटका फळांच्या निर्यातीला बसला आहे. जेबेलअली आणि चाबहार बंदर बंद करण्यात आल्यामुळे द्राक्ष, कांदा, केळी या पिकांची निर्यात ठप्प झाली असल्याचं अपेडा मुंबईचे उपमहाव्यवस्थापक नागपाल लोहकरे यांनी सांगितलं.

**खेड-स्फोट- रत्नागिरी**

रत्नागिरी जिल्ह्यातील, खेड तालुक्यातल्या लोटे परशुराम औद्योगिक वसाहतीतल्या एका कारखान्यात काल दुपारी झालेल्या स्फोटात, नऊ कामगार भाजले असून, त्यापैकी पाच कामगारांची प्रकृती गंभीर आहे. डॉक्टर खान केमिकल कंपनीत रिॲक्टरचा स्फोट झाल्याने ही दुर्घटना घडली.

**सुखोई-अपघात**

भारतीय हवाई दलाचं सुखोई - 30MKI लढाऊ विमान आसाम मधील जोरहाट हवाई तळापासून सुमारे 60 किमी अंतरावर काल कोसळून झालेल्या अपघातात दोन वैमानिकांचा मृत्यू झाला. स्क्वाड्रन लीडर अनुज आणि फ्लाइट लेफ्टनंट पूर्वेश दुरगकर यांचा या अपघातात मृत्यू झाला. विमानाने नियमित प्रशिक्षणासाठी उड्डाण केलं होतं.

**हवामान**

राज्यात आज सर्वत्र हवामान कोरडं राहण्याचा अंदाज पुणे वेधशाळेने वर्तवला आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.